
# जीवन --- एक संघर्ष




मला लहानपणापासून वाचनाची आवड असल्यामुळे मी अनेक पुस्तके वाचली. पण ज्ञानराज पाटकर यांनी लिहिलेले ' स्वल्पविराम ' हे पुस्तक वाचले आणि माझे डोके सुन्न झाले..एखादे पुस्तक हाती आले की ते पुस्तक मी सलगपणे वाचून काढते.. पण ' स्वल्पविराम ' वाचताना मी कित्येकदा इतकी भावनाविवश झाले की डोळ्यांसमोर पुस्तक असूनही मला त्यातील अक्षरे दिसत नव्हती.. दिसत होते फक्त लेखकाचे दुःख, असहाय्य वेदना, पण त्या सर्वांवर मात करण्याची त्याची असामान्य जिद्द व सकारात्मता आपल्याला जीवनाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन देते.

ज्ञानराज पाटकर व्हीजेटीआय - इंजिनीयर, लेखक, क्रिकेट व अभिनयाची आवड जोपासणारा एक कुटुंबवत्सल तरूण.

त्याची ही कथा. आपल्या वडिलांना व काकांना पॉलिसीस्टिक किडनीचा विकार होता व त्यांना ५२-५३ वर्षांचंच आयुष्य लाभलं हे सर्व माहीत असल्यामळे आपल्या डॉक्टर मित्राच्या सल्ल्यानुसार वयाच्या ४५व्या वर्षी संपूर्ण चेक-अप करतो व तपासणीदरम्यान आपल्यालाही आनुवंशिक विकार झाला आहे हे त्याला समजते.. वडिलांच्या निधनामुळे अकाली आलेले प्रौढत्व आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून मनाने खचून गेल्यावरही एका नवीन उमेदीने तो आयुष्याकडे बघण्याचे ठरवतो.. परमेश्वरावर नितांत विश्वास ठेवून, तोच कर्ता-करविता.. त्यालाच आपली काळजी असे मानल्यावर सर्व मार्ग सोपे होतात.

किडनीविकाराचे निदान झाल्यावरही त्यांच्या दैनंदिन आयुष्यात काहीही फरक पडत नाही. आहारावर नियंत्रण ठेवून व वेळेवर औषधे घेऊन सहा वर्ष डायलिसीसचा उपचार लांबविण्यात त्यांना यश मिळते. पण अखेर एक दिवस डॉक्टर भरत शहा रक्तातील क्रिएटिनीन नऊच्यावर गेल्यावर डायलिसीस सुरू करावे लागणार हे सांगतात. ह्या सर्वात त्यांची पत्नी शुभदा व त्यांचे कुटुंब त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहाते.. उजव्या किडनीत इन्फेक्शन (संसर्ग) झाल्याने ती किडनी काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागते.. त्यातच आजारपणामुळे संचालकपदाची त्यांची नोकरीही जाते.. वयाच्या एक्कावन्नाव्या वर्षी हा नवीन आघात.. देवाने कठोर परीक्षा बघण्याचे ठरवलेलेच होते.. पण अखेर सख्खी बहीण सुजाता (आत्ताची गौरी पोरे) आपल्या भावाला स्वतःची किडनी देण्याचे ठरवते व तिच्या धाडसी निर्णयाला तिचा पती शेखर व सासरची मंडळी पाठिंबा देतात. किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी होते.. त्यानंतर पुन्हा नवीन जोमाने ते आयुष्याला सामोरे जातात व 'नर्मदा किडनी फाउंडेशन' चे सभासदत्व घेऊन 'अवयवदान चळवळीत' व 'जनजागृती मिशन' मध्ये स्वतःचे अनुभव किडनीग्रस्तांना अभिनय व भाषणाद्वारे सांगण्याचे मोलाचे काम ज्ञानराज पाटकर करत आहेत... अवयव दान हेच श्रेष्ठ दान. सुजाता पाटकरनी आपल्या भावाला आपली किडनी दिली.. धन्य तिचे आई- वडिल ज्यांनी अश्या कन्येला जन्म दिला.. ज्ञानराज (राजन) व सुजाता या दोघांनाही पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा !

आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक कठीण प्रसंगाला हसतमुखाने सामोरे गेल्याने, आयुष्य पुनः सुखकर व आनंदी होते. ह्यालाच म्हणतात आयुष्य ! दुःखाचे फेरे कोणाले चुकले नाहीत, पण सुख कधी ना कधी आपल्या नशीबाचे दार ठोठावतेच.

**दर्शना प्रभूतेंडोलकर**